प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दिनांक : १३.०८.२०२२**

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सिडकोमध्ये पदयात्रा आणि वृक्षारोपण कार्यक्रम साजरा

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त **डॉ. संजय मुखर्जी,** उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको महामंडळामध्ये १३ ऑगस्ट २०२२ रोजी पदयात्रा आणि वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमांवेळी **श्री. एस. एस. पाटील,** सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सर्वत्र देशभर मोठ्या उत्साहाने साजरा होत असून यानिमित्त घरोघरी तिरंगा अभियानासह अनेक विधायक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सिडको महामंडळातही डॉ. संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी निबंध व कविता लेखन स्पर्धा, पदयात्रा, फुटबॉल सामना, देशभक्तीपर गीते इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १३ ऑगस्ट २०२२ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सिडकोचे मुख्यालय असलेल्या सिडको भवन ते रायगड भवन दरम्यान सकाळी ०९.०० वाजता पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर सकाळी १०.०० वाजता रायगड भवनसमोरील मैदानात वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. तसेच संध्याकाळी ०५.०० वाजता सेंटर ऑफ एक्सलन्स येथे प्रदर्शनीय फुटबॉल सामन्याचेही आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमांमध्ये सिडकोतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे आणि मोठ्या प्रमाणावर आपला सहभाग नोंदवला.

---

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**